...UME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
...ANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# २१. दलित साहित्य समीक्षा

**प्रा. डॉ. अशोक पाठक**
लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, परतूर, जि. जालना.
**शरद ठाकर**
संशोधक विद्यार्थी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद.

...स्तावना

स्वातंत्र्योत्तर काळात मराठी साहित्यात विविध प्रवाह निर्माण झाले त्यात दलित साहित्य प्रवाह हा ...त्वाचा वाङ्मय प्रवाह मानल्या जातो. दलित साहित्याच्या निर्मितीला खऱ्या अर्थाने महात्मा फुले यांच्या ...खनातून प्रथम प्रेरणा मिळते.१८५५ ते १८९० हा काळ महात्मा फुले यांचा वाङ्मयीन भारावलेला काळ होता. या ...ळात महात्मा फुले यांनी दलितांच्या पुढील पिढ्यांना प्रेरणा दिली. दलित साहित्याचे खरे बीजारोपण महात्मा फुले ...च्या विचार व कृतीतून झालेले आपल्याला दिसून येते, कारण महात्मा फुले यांनी आपल्या विचारातून व कृतीतून ...माजिक विषमता नष्ट करण्यासाठी, समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. त्यांनी गुलामगिरी, ...तीय रत्न, सार्वजनिक सत्यधर्म, शेतकऱ्याचा आसूड असे ग्रंथ लिहिले. त्यातून खऱ्या अर्थाने दलितांना न्याय मिळवून देण्यासाठी दलितांचा आवाज आपल्या लेखनातून मांडला व प्रेरणा दिली आणि यापुढे १९६० नंतर या ...वाहाला डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांमुळे नवचेतना मिळाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिका, संघटित ...व्हा आणि संघर्ष करा हा संदेश दिला. त्याप्रमाणे दलित समाजाची पूर्वीची बंधनं संविधानाने नष्ट झाल्यामुळे मोकळेपणाने आपले विचार लिखित स्वरूपात मांडू लागला. दलित म्हणजे इथे फक्त विशिष्ट जात किंवा धर्म अपेक्षित नव्हता. दलित म्हणजे खऱ्या अर्थाने ज्यांच्यावर अन्याय, अत्याचार होतो. ज्यांना न्याय्य हक्क मिळत नाहीत, ज्यांची समाज व्यवस्थेकडून पिळवणूक होते. ते सर्व दलित, शेतमजूर, कामगार, स्त्रिया यांच्यासह दलित दीन-दुबळे पीडित पिचले गेलेले जे कोणी असतील ते सर्व दलित या वर्गात समाविष्ट होतात; परंतु दलित साहित्य म्हणजे ते फक्त बौध्द धर्मियांनी लिहिलेले साहित्य हे दलित साहित्य असे काही समजतात ते चुकीचे आहे आणि या दीन-दुबळ्या पीडित पिळवणूक होणाऱ्या सर्वांनी आपल्याला संविधानाने दिलेल्या हक्कानुसार आपले विचार व्यक्त